उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार स्पर्धा योजना स्वरुप, अटी/शर्ती, निवडीचे निकष व कार्यपध्दती विहित करण्यास शासन मान्यता देण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांकः मावज २०१९/प्र.क्र.१९४/कार्या.३४
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक:- १९ जुलै, २०१९

वाचा :-

१) शासन निर्णय क्रमांक: सामान्य प्रशासन विभाग, क्र.संकीर्ण-२०१४/प्र.क्र.२१३/३४, दि.१ ऑगष्ट,२०१४.

२) शासन निर्णय क्रमांक: सामान्य प्रशासन विभाग, क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.११३/३४, दि.१८ मे, २०१५.

३) शासन निर्णय क्रमांक: सामान्य प्रशासन विभाग, क्र.मावज-२०१५/प्र.क्र.२२/३४, दि.१९ डिसेंबर,२०१५.

४) माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे पत्र क्र.वृत्त(२०१९)/उपपु.राष्ट्रीय/का-२/९८८, दि.६ जुलै,२०१९.

प्रस्तावना:-

शासनाच्या विविध विकास योजना, त्याची अंमलबजावणी व या अंमलबजावणीच्या प्रक्रियेमध्ये लोकांचा सहभाग या बाबी जनतेपर्यंत पोहोचविणे व त्याव्दारे संबंधितांना प्रोत्साहन देण्यासाठी प्रसारमाध्यमांची भूमिका अतिशय महत्वाची आणि परिणामकार ठरत आहे. अशा चांगल्या प्रयत्नांना पुरस्काराच्या माध्यमातून प्रोत्साहीत करणे आवश्यक आहे. याष्टीने संदर्भाधीन शासन निर्णय क्र.१ ते ३ अन्वये उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार निवडीसंबंधीचे निकष विहीत केलेले आहेत. महाराष्ट्र राज्याच्या बाहेर पत्रकारितेच्या माध्यमातून जनजागृतीचे काम करणाऱ्या व आपल्या लेखणीने पत्रकारितेला प्रतिष्ठा मिळवून देणाऱ्या व सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक इत्यादी विषयांवर सातत्याने लिहिणाऱ्या ज्येष्ठ पत्रकार/संपादकांना राष्ट्रीय पातळीवरील पत्रकारितेच्या त्यांच्या योगदानाबद्यल पुरस्कार देण्याची बाबत शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

संदर्भाधीन शासन निर्णय क्र. १, २ व ३ नुसार विहित केलेल्या पुरस्कारांमध्ये खालील पुरस्काराचा समावेश करण्यात येत आहे :-

महाराष्ट्र राज्याच्या बाहेर पत्रकारितेच्या माध्यमातून जनजागृतीचे काम करणाऱ्या व आपल्या लेखणीने पत्रकारितेला प्रतिष्ठा मिळवून देणाऱ्या व सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक इत्यादी विषयांवर सातत्याने लिहिणाऱ्या व्यक्तींना, **"अटलबिहारी वाजपेयी राष्ट्रीय पत्रकारिता पुरस्कार"** (राष्ट्रस्तरीय) सन २०१८ या वर्षापासून सुरु करण्यात येत आहे." या पुरस्काराचे स्वरुप **रु.१,००,०००/- (रुपये एक लाख रोख) व प्रमाणपत्र** असे असेल.

हा पुरस्कार सुरु केल्यामुळे संदर्भाधीन शासन निर्णय क्र.१ अन्वये विहित केलेल्या उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार निवडीसंबंधीच्या निकषामध्ये पुढील निकषांचा समावेश करण्यात येत आहे :-

१. महाराष्ट्रातील पत्रकारांसाठी देण्यात येणाऱ्या लोकमान्य टिळक जीवनगौरव पुरस्काराचे स्वरुप रुपये १ लाख आणि प्रमाणपत्र असे आहे. त्याच धर्तीवर राष्ट्रीय पातळीवर देण्यात यावयाच्या "अटलबिहारी वाजपेयी राष्ट्रीय पत्रकारिता पुरस्काराचे" स्वरुप रुपये १ लाख आणि प्रमाणपत्र असे राहील.

२. महाराष्ट्र राज्याच्या बाहेर पत्रकारितेच्या माध्यमातून जाणीवजागृतीचे काम करणाऱ्या व आपल्या लेखणीने पत्रकारितेला प्रतिष्ठा मिळवून देणाऱ्या व सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक इत्यादी विषयांवर सातत्याने लिहिणाऱ्या ज्येष्ठ पत्रकार/ संपादकांना राष्ट्रीय पातळीवरील पत्रकारितेच्या त्यांच्या योगदानाबद्यल हा पुरस्कार देण्यात येईल.

३. पुरस्कारासाठी निवडण्यात येणारे राष्ट्रीय स्तरावरील संपादक/पत्रकार यांनी किमान २५ वर्षे दिल्ली वा देशातील इतर प्रांतात, नामवंत व दर्जेदार दैनिक/पाक्षिक/साप्ताहिक यामध्ये काम केलेले असावे.

४. प्रवेशिका पाठविताना अर्जदाराने वृत्तपत्र/इलेक्ट्रॉनिक्स मिडीयामध्ये प्रसिध्द झालेल्या महत्वाच्या बातम्या, लेख, वृत्तविशेष इत्यादींची कात्रणे/व्हिडीओ सीडी हे त्याच्या प्रसारणाच्या तारखेच्या माहितीसह सादर करावे.

५. इतर पुरस्कारांसाठी असलेले इतर सर्व नियम व अटी, **“अटलबिहारी वाजपेयी राष्ट्रीय पत्रकारिता पुरस्कार”** यासाठीही लागू असतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०७१९१६१०१०५२०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ramkisan Narayanrao Musale

Digitally signed by Ramkisan Narayanrao Musale
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e28f6332f6edfebdfb055bf154f99ec0b0d9e613209e20e7a215f026da6875ae, cn=Ramkisan Narayanrao Musale
Date: 2019.07.19 16:21:11 +05'30'

(रा.ना.मुसळे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
२. सचिव (मा. व ज.), यांचे स्वीय सहायक,
३. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
४. महालेखापाल ½ (लेखा व अनुज्ञेयता) (लेखा परीक्षा), मुंबई
५. अधिदान व लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
६. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
७. संचालक (माहिती)(प्रशासन), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
८. संचालक (माहिती)(वृत्त व जनसंपर्क), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
९. उपसंचालक (लेखा), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
१०. सर्व विभागीय संचालक/माहिती अधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
११. निवडनस्ती, कार्या.३४

परिशिष्ट "अ"

सदर परिशिष्ट शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१४/प्र.क्र.११३/३४ दिनांक १ ऑगस्ट, २०१४ रोजी निर्गमित झालेल्या शासन निर्णयातील परिशिष्ट "अ" मध्ये समाविष्ट करण्यात येत आहे.

अ.क्र.	स्तर	पुरस्काराचे नाव	स्वरुप
१९	राष्ट्रस्तरीय	अटलबिहारी वाजपेयी राष्ट्रीय पत्रकारिता पुरस्कार	रु.१,००,०००/- मानचिन्ह व प्रशस्तीपत्र